त्यांनी " आओ साईबाबा ! " अशा शब्दात स्वागत केले व हेच नाव बाबांनी अखेरपर्यंत धारण केले.

बाबा शिर्डीस आल्यावर एका पडक्या मशिदीत रहात, त्या मशिदीला ते द्वारकामाई म्हणू लागले. ते गरीब, गरजू व आजारी लोकांना औषधपाणी सांगू लागले ते रोग्यांची सेवासुश्रूषा करीत. पुढे पुढे ते औषधपाणी देण्याऐवजी उदी म्हणजे अंगारा देऊ लागले व त्या अंगाऱ्याने लोक बरे पण होऊ लागले. बाबा दिवसा गावात भिक्षेला जात व जे काही आपल्या टमरेल्यात मिळे त्यावरच उदरनिर्वाह करीत. गावातले लोक त्यांना एक वेडा फकीर मानीत. पण पुढे पुढे त्यांची योग्यता शिर्डीच्या लोकांना कळून आली. त्यांनी एकदा पणत्यांमध्ये तेलाऐवजी पाणी ओतले व त्या पणत्या पेटविल्या. पुणतांबे येथले श्रीगंगागीरबाबा एकदा शिर्डीस आले असता त्यांनी साईबाबांना पाहिले आणि ते शिर्डीवासियांना म्हणाले, "हे केवळ एक रत्न आहे. याची योग्यता फार मोठी आहे. तुमच्या गावचे फार मोठे भाग्य की हे अमोल रत्न तुम्हाला लाभले." अक्कलकोट स्वामींचे शिष्य श्रीआनंदनाथ महाराज यांनी गावकऱ्यांना म्हटले, " हा हिरा आहे याची खरी किंमत तुम्हाला नाही. हा जरी उकिरड्यावर असला तरी प्रत्यक्ष हिरा आहे हे ध्यानात ठेवा."

बाबांना जरी लोक वेडे पीर म्हणत तरी स्वतः बाबांनी कुणाला दुखविले नाही. ते मोठे प्रेमळ व दयाळू अंतःकरणाचे होते. सर्वांवर त्यांचे प्रेम होते व त्यांचे पुत्रवत् पालन बाबा करीत. गावावर कोणतेही संकट यावयाचे असले की बाबा त्याची आगाऊ सूचना देत त्यामुळे लोकांची बाबांवर श्रद्धा बसली व आता लोक त्यांना 'महाराज' असे अत्यादराने संबोधू लागले. शिर्डीत बाबांची जी निकटवर्ती मंडळी होती ती म्हणजे तात्या कोते पाटील, माधव बळवंत देशपांडे, बाबासाहेब व नानासाहेब डेंगळे, रहात्याचे चंद्रभान शेट मारवाडी, काशीराम शिंपी, आप्पा जागले, गोपाळराव बुटी, नानासाहेब चांदोरकर साठे इ. होत.

बाबा हे संत श्रीकबीराचे अवतार समजले जातात. तसेच ते कृष्ण, दत्त, व राम अशा अवतारांपैकीच होते. मुसलमानांच्या अल्लाचे ते उपासक होते. हिन्दु व मुसलमान या उभय धार्मिकांच्या बद्दल त्यांना प्रेम होते. या उभय धर्मीय बांधवांचे आध्यात्मिक पायावरचे ऐक्य दृढ करणे हाच त्यांचा उद्देश होता. ते आपल्या उपदेशातून मानवता धर्माचे श्रेष्ठत्व पटवीत. आपण केवळ परमेश्वराचे सेवक आहोत असेच ते सांगत. शिष्याची भूमिका शुद्ध करून मग त्यात ज्ञानाचे बीज पेरावयाचे ही सद्‌गुरूची शास्त्रोक्त वहिवाट त्यांनी अंगिकारली होती. बाबांनी आपल्या अद्‌भुत योग शक्तीचे अनेक चमत्कार दाखविले म्हणूनच की काय शिरडीत मुंबई – पुणे– ठाणे कडील मंडळींची अक्षरशः गर्दी होऊ लागली. पुढे पुढे तर चावडीत बाबांची आरती होऊ

लागली. बाबा बैठकीतून गोष्टीरूपाने बोध करीत. त्यांनी गहन वेदांत विषयाची चर्चा कधीच केली नाही. उपनिषदावर त्यांनी प्रवचन केले नाही. श्रद्धा व सहनशीलता या दोन तत्त्वांची त्यांनी आपल्या भक्तांना ओळख करून दिली. त्यांनी आपले शिष्य-संप्रदाय निर्माण केले नाहीत. त्यांनी आपले विचार प्रकट करण्यासाठी ग्रंथ लिहिले नाहीत, त्यांनी भक्तांना दया, प्रेम, समता, बंधुभाव, परोपकार व त्याग यांचे महत्त्व सांगितले. हिंदू, मुसलमान, पार्शी, यहुदी, इराणी, ख्रिश्चन इ. विविध धर्मीयांना सन्मार्गावर आणण्याचा त्यांनी यत्न केला.

आजची निधर्मी राज्याची कल्पना त्यांनी १८५८ साली शिर्डीत आणली. श्रीअक्कलकोट स्वामी, शेगावचे श्रीगजानन महाराज, माणिक नगरचे श्रीमाणिक प्रभू, श्रीवासुदेवानंद सरस्वती ऊर्फ टेंबे स्वामी, साकोरीचे श्रीउपासनी बाबा व शिर्डीचे हे साईबाबा ही सारी समकालीन संत श्रेष्ठ मंडळी होत.

भगवान श्रीसाईबाबा हे साम्यवादी, अद्वैतवादी, महान अवतारी पुरुष होते. मंगळवार ता. १५ ऑक्टोबर १९१८ रोजी विजया दशमीस तिसरे प्रहरीं त्यांनीं महानिर्याण केले. त्यांच्या निर्याणाने अखिल महाराष्ट्राला अत्यंत दुःख झाले. त्यांचे पहिले श्राद्ध श्रीदासगणू महाराजांच्या उपस्थितीत पार पडले. बाबांच्या शिकवणुकीचा प्रचार-प्रसार कीर्तनाच्या द्वारे दासगणू महाराजांनीच जास्त केला. बाबांचा पार्थिव देह जरी परलोकी गेला असला तरी त्यांचे अवतार कार्य सचेतन आहे. आपल्या भाविकगणात ते अजरामर झाले आहेत. ते अजूनही आपल्या भक्तांना स्वप्नांत, जागृतावस्थेत भेटतात, दिसतात, व विविध स्वरूपात दर्शन देतात. भक्तांच्या नवसास पावतात, संकटास धावून येतात. संकटाचे निवारण करतात. बाबांचे भक्त जगभर पसरलेले आहेत. बाबांची मंदिरे आता जगभर आहेत. त्या मंदिरातून बाबांच्या प्रतिमा, पुतळे आहेत, त्यांचे भक्तगण रोजचे रोज त्यांचे पूजन अर्चन मोठ्या भक्तिभावाने करतात.

श्रीसाईबाबांच्या जागृत अशा तीर्थक्षेत्री अनेक गोष्टी खरोखरच पहाण्यासारख्या आहेत. सर्वात मोठे आकर्षण आहे ते म्हणजे येथल्या समाधिमंदिराचे. भगवान श्रीसाईंनी १९१८ च्या विजयादशमीस देहत्याग केल्यावर त्यांचे पार्थिव शरीर याच ठिकाणी चिरविश्रांती घेत आहे. आजचे समाधिमंदिर म्हणजे एकावेळी बाबांचे एक निःसीम भक्त नागपूरचे श्रीमंत गोपाळराव ऊर्फ बापूसाहेब बुटी यांचा वाडा होय. बाबांच्या हयातीत या बुटींना आपल्या वाड्यात श्रीमुरलीधराचे देवालय बांधण्याचा दृष्टांत शिर्डीत झाला तसाच दृष्टांत बाबांचे आणखी दोन भक्त कै. माधवराव देशपांडे व हरी सीताराम दीक्षित ऊर्फ काका यांना पण झाला. याप्रमाणे बुटींनी श्रीबाबांची

परवानगी घेऊन मंदिर बांधणीचे काम बाबांच्या खास देखरेखी खाली सुरू केले एकदा बाबा लेंडी बागेकडे चालले होते. मंदिर जवळ जवळ बांधून पूर्ण झाले त्यामुळे आता उद्‌घाटनाचा मुहूर्त करावयाचा होता. माधवराव देशपांडे बाबांना म्हणाले, देवा, देऊळ बघायला चला. तेव्हां बाबा आत गेले व आज ज्या ठिकाणी प्रत्यक्ष समाधि आहे तेवढीच जागा आखून म्हणाले, आता आपण येथेच रहायला येऊ, येथेच खेळू. माझी हाडं या तुर्बतीतून बोलतील".

बाबांच्या त्या त्यावेळच्या वाणीनुसार त्यांचे महानिर्वाण झाल्यावर त्यांचा पार्थिव देह या जागी उतरवण्यात आला आहे. बुटींचा हा वाडा काळया दगडांची भव्य इमारत आहे व त्या इमारतीत संगमरवरी प्रस्तराच्छादित समाधि आहे. या समाधीवर भाविक बाबांवरील आपल्या श्रद्धेचे प्रतीक म्हणून मौल्यवान चादरी पसरतात व पुष्पमाला वहातात. या समाधि लगतच एका सिंहासनावर बाबांचा एक भव्य संगमरवरी पुतळा आहे. बाबांचा डावा पाय उजव्या पायाच्या मांडीवर आहे. बाबांच्या या मनोहर मूर्तीकडे बघत राहिले की बाबा प्रत्यक्षच आपणाकडे बघत आहेत असा भास होतो. या पुतळ्याचे सर्वच शिल्प अगदी रेखीव व प्रमाण बद्ध आहे. हा असा नयनमनोहर अप्रतीम पुतळा मुंबापुरीतले एक विख्यात शिल्पकार श्री–बाळाजी वसंत तालीम यांनी महत् प्रयासाने तयार केला व तो या समाधि मंदिरांत १९५४ साली मोठ्या समारंभाने स्थानापन्न करण्यात आला. या पुतळयाच्या अनावरण प्रसंगी अहमदाबादचे विख्यात साईभक्त श्रीसाईशरणानंदजी हजर होते. श्रीबाबांचा हा पुतळा इटालियन मार्बलचा आहे. बाबांच्या या पुतळ्यास भाविक शाली लपेटतात व त्यांच्या मस्तकाभोवती रुमाल बांधतात. पुतळयासभोवती चांदीची प्रभावळ आहे. व मस्तकावर चांदीची गोलाकार छत्री कायमची उघडी लटकत आहे. छत्रीच्या वर काही अंतरावर "रघुपती राघव राजाराम पतीत पावन साईनाम" हे चरण लिहिलेले आहेत. समाधि व पुतळा दोन्ही, तीन पायऱ्या उंच अशा चौथऱ्यावर आहेत. त्यांच्या सभोवती कठडा आहे चौथऱ्याच्या दोन्ही टोकांस दोन मजबूत दक्षिणा पेट्या आहेत. भाविकांनी भेट रक्कम या पेटीतच टाकायची असते, या पेट्या महिन्याच्या शेवटच्या दिवशी उघडण्यात येतात व रक्कम मोजली जाते. समाधि मंदिरा समोरच विशाल सभामंडप असून त्यास 'साईदरबार' असे म्हणतात. येथे एकावेळी सहाशे लोक सहज बसू शकतात. संगमरवरी लादी येथे बसविण्यात आली आहे. भिंतीवर संतांच्या व बाबांच्या भक्तांच्या तसबिरी टांगलेल्या आहेत. समाधिमंदिर मजलीचे आहे मजल्यावर काही खोल्या असून त्या भाविकांना रहाण्यासाठी दिल्या जातात. सभामंडपाच्या पुढे आणखीनही एक फरसबंद मोकळी जागा आहे तिथे पादत्राणे काढून ठेवली जातात. जवळच हात पाय धुण्यास संगमरवरी फर्शीने सुशोभित केलेल्या मोरीची सोय आहे. तिथे पाच नळ बसविलेले आहेत. समाधिमंदिरच्या बाहेरच्या अंगास अनेक खोल्या असून तिथे संस्थानच्या व कारभाराच्या, कोर्ट रिसिव्ह-

रांच्या कचेऱ्या आहेत. आतील अंगास असलेल्या खोल्या बाबांचे पूजा साहित्य, भांडी, कपडे इ. ठेवण्यासाठी वापरल्या जातात. सभामंडपाला तळघरही आहे. मंदिराच्या मागील बाजूस विहीर आहे. जवळच स्नानघर पण आहे. समाधि मंदिराची स्वच्छता कटाक्षाने पाळली जाते. समाधिमंदिरावर सोन्याचा कळस असून तो २८ सप्टेंबर १९५२ रोजी विजया दशमीचे दिवशी दुपारी बारा वाजता श्रीसंत डॉ. रामचंद्र प्रल्हाद पारनेरकर महाराजांचे शुभहस्ते बसविण्यात आला. समाधिमंदिर हे खरोखरच जागृत देवस्थान आहे. दिवसाकाठी चार वेळा समाधिमंदिरात आरती होते व बाबांना पंचारतीनीं अनन्यभावे ओवाळिले जाते. गुढीपाडवा, रामनवमी, गुरुपौर्णिमा व दसरा असे चार मोठे उत्सव शिरडीत साजरे केले जातात व त्याप्रसंगी हजारों भाविक दर्शनास येतात.

श्रीसाई दरबारात प्रवेश केल्यावर डाव्या अंगास बाहेरून काच लावलेल्या एका लहानशा खोलीत बाबा वापरीत असलेले कपडे, त्यांचे अंगरखे चिलिमी, जोडे, ग्रामोफोन, काठी, छत्री, माठ, इ. विविध वस्तू बाहेरून पहाणाऱ्याला व्यवस्थित दिसतील अशा मांडून ठेवलेल्या आहेत व त्याच्याच समोरच्या कपाटात श्रीसाईबाबा संस्थान शिरडी तर्फे आता पर्यंत प्रकाशित केलेल्या पुस्तकांच्या एकेक प्रति, बाबांचे फोटो केवळ भक्तांना पहाण्यासाठी म्हणून ठेवलेले आहेत. संस्थानतर्फे साईलीला नावाची इंग्रजी व मराठी अशा भाषातून मासिकेही प्रकाशित होतात. मराठी मासिक तर गेली ५२ वर्षे प्रकाशित होत आहे.

शिर्डीतील दुसरे प्रेक्षणीय स्थान म्हणजे "द्वारकामाई" होय. हे नाव बाबांनी ठेवलेले आहे. ही एक मशिद आहे. बाबा जेव्हा शिर्डीत आले तेव्हा त्यांचे पडक्या मशिदीत वास्तव्य होते. १९१२ व नंतर १९५२ मध्ये या मशिदीची डागडुजी करण्यात आली व तिला आताचे भव्य मंदिराचे स्वरूप आले आहे. द्वारकामाईत एका उंच अशा चौथऱ्यावर दक्षीणाभिमुख बाबांची एक भव्य तसबीर एका मोठ्या देव्हाऱ्यात ठेवण्यात आली आहे. या तसबिरीतील बाबांची हुबेहूब प्रतिमा श्री. शामराव जयकर नावाच्या मुंबईच्या एका चित्रकाराने आपल्या कुशल कुंचल्याने चितारली आहे. बाबांना समोर बसवून शामरावाने ही प्रतिमा चितारली आहे हे विशेष होय. या तसबिरीच्या समोर संगमरवरी पादुका आहेत. तसबीर व पादुकांच्या दोन्ही बाजूला नंदादीप तेवत असतात. जवळच बाबांची नेहमी वापरावयाची खुंट्यांसहित दोन जाती व त्याच्या बाजूला गव्हानी भरलेले पोते आहे. तसबिरीच्या समोरच धुनीमाई आहे. ही धुनी स्वतः बाबांनी आपल्या हातातला चिमटा आपटून प्रज्वलित केली व तेव्हापासून तो आजतागायत ही अखंड पेटत ठेवण्यात आली आहे. येथूनच उदीची प्राप्ती भाविकांना होते. तसबिरीच्या दुसऱ्या अंगास एक दगडी चौरंग आहे. त्यावर बसून बाबा स्नान करीत असत.

द्वारकामाईत प्रवेश केल्यावर उजव्या बाजूस जो जंगी पाषाण आहे त्यावर बाबा नित्य बसत, त्यावर त्यांच्या पादुका पण आहेत. या पाषाणावर बाबांची एक टोलेजंगी तसबीर टांगण्यात आली आहे व ती सदा पुष्पमालांनी अलंकृत असते. द्वारकामाईत तुळसी वृंदावन, बाबांची हात टेकून उभे रहाण्याची भिंत, बाबांचा हस्त स्पर्श करून बाजूने जाण्याचा लाकडी स्तंभ व शेजारीच एक चूल आहे. जवळच्याच एका खोलींत बाबांचा रथ व पालखी ठेवण्यात आलेली आहे. या दोन्ही वस्तु उत्सवप्रसंगीं बाहेर काढल्या जातात. द्वारकामाई म्हणजे हिंदु-मुस्लीम व पार्शी या तिन्ही धर्मीयांच्या एकतेचे प्रतीक आहे.

द्वारकामाईच्या पूर्वेस "चावडी" आहे. येथे बाबा एक दिवसा आड निद्रासुख घेत. येथे बाबांची नित्यनेमाने आरती होत असे व त्यानंतर उदीचा प्रसाद बाबा चिलीम प्याल्या नंतर मिळत असे. चावडीत बाबांची एक मोठी तसबीर एका आसनावर असून समोरच एका खास बनवलेल्या काचेच्या पेटीत बाबांचे पादत्राण ठेवलेले आहे. चावडीत काचेच्या हंड्या व देवदेवतांच्या बाबांच्या वेळेपासूनच्या किती तरी तसबिरी टांगण्यात आलेल्या आहेत. चावडीत बाबा ज्या फळीवर झोपत असत ती फळी व बाबांना भेटी दाखल एका भक्ताने दिलेली दोन चाकाची लाकडी खुर्ची पण ठेवण्यात आली आहे. चावडीतील वातावरण सुगंधी असून तिथे विशिष्ट मर्यादेच्या पलीकडे स्त्रियांना प्रवेश दिला जात नाही.

शिर्डीतील वरील तीन स्थानांप्रमाणेच महत्त्वाचे जे स्थान आहे, ते म्हणजे गुरु-स्थान. बाबा शिर्डीत अवतीर्ण झाल्यानंतर ते नेहमी या निंबवृक्षाखाली बसत. हा वृक्ष आज समाधिमंदिराच्या मागील बाजूस आहे. हे आपल्या गुरुरायाचे स्थान आहे, असे बाबा नेहमी सांगत. येथे त्या निंबाच्या पानाला कडवटपणा अजिबात नाही. येथे गुरुवार - शुक्रवार जो ऊद जाळील त्याचे कल्याण होईल असे बाबांनीं सांगितलेले आहे. निंब वृक्षाखाली बाबांच्या पादुका असून बाबांनी स्वहस्ते स्थापन केलेली श्रीशंकराची पिंडी आहे. गुरुस्थानासमोरच संस्थानची कचेरी व रस्त्याच्या पलीकडील बाजूस संस्थानचे भोजनगृह व चहाचे कॅन्टीन आहे. भोजनगृहात टेबल खुर्चीवर एकावेळी दोनशे भाविक बसतात.

बाबांच्या समाधिमंदिरापासून अगदी जवळच एक सुंदर बाग आहे तिचे नाव लेंडी बाग. येथे बाबा नित्य भल्यापहाटे शौचास जात. येथल्या झाडाना बाबा स्वतः पाणी आणून घालीत. या बागेत विविधरंगी गुलाबाची रोपटी, झेंडू, मोगरा, जास्वंद, तुळस इ. असून वड, पिंपळ, निंब, शेगूल इ. झाडे आहेत. या बागेतल्या निंबाच्या बुंध्याशी बाबा तासन् तास बसत व म्हणूनच की काय बाबांचे स्मारक म्हणून तेथे

एक घुमटी बांधलेली असून तिथे सतत नंदादिप तेवत असतो. लेंडीबागेच्या प्रवेश-द्वाराजवळच अबदुल्ला, नानावल्ली व भाऊमहाराज (तात्या कोते पाटील) यांच्या शेजारी शेजारी अशा तीन समाध्या आहेत. बाबांच्या लाडक्या शामसुंदर नावाच्या घोड्याची समाधि याच लेंडीबागेत आहे.

श्रीबाबा शिर्डीत आल्यावर देवदर्शनासाठी म्हणून तेथल्या खंडोबाच्या छोटयाशा मंदिरात आले व येथेच म्हाळसापतींनी त्यांचे स्वागत करून 'आओ साईबाबा' असे म्हटलें आणि येथूनच पुढे बाबांनी 'साईबाबा' हे नाव धारण केले ते कायमचेच. आज या देवळात श्रीखंडोबा, बाणाई व म्हाळसा या तिघांच्या मूर्ती आहेत.

शिर्डीत या धार्मिक स्थानाशिवाय श्रीसाईनाथ रुग्णालय, लग्न मुंजी कार्यासाठी श्रीसाईमंगल कार्यालय व शिक्षणासाठी साईनाथ माध्यमिक विद्यालय या वास्तू पण आहेत . शिर्डी पहाण्यासाठी आलेला भाविक बाबांच्या दर्शनानंतर या वास्तूना पण भेटी देतो आणि शिर्डी संस्थानच्या कारभाराचे आणि मुख्य रिसिव्हर साहेब श्री का. सी. पाठक यांच्या कार्याचे कौतुक करतो आज शिर्डीत सर्वत्र सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते आहेत, त्यावरून ट्यूबलाइटचा प्रकाश आहे, ठिकठिकाणी चौकांत कारंजी आहेत. बसण्यासाठी चांगली बाके आहेत, व भाविकांना रहाण्यासाठी भक्तनिवासाची सोय आहे, भाविक येथे येतात श्रीबाबांच्या समाधीचे डोळे भरुन दर्शन घेतात. कृतकृत्य होतात आणि पुन्हा येण्याचा निश्चय करून शिर्डीचा निरोप घेतात.

## श्री–स ; याचना

विजय हजारे

तार अथवा मार
तूंच गजानना
जरी नाही केली
तुझी मी साधना .
तारणार कोण
तुझ्याविण दुजा
नच जरी केली
स्तोत्र पाठ पूजा.

टाकुनिया भार
चालतो मी देवा
विसंबून आणि
तुझ्यावर
कुणी नाही त्राता
अपराध कोटी
घालण्या पोटांत
तुझ्याविना
बुडलो मी आतां
माझ्या 'मी' पणांत
दीना या वांचवा
जगन्नाथा.

# श्रीसाईनाथ महाराज ललितचरित्र

श्री. र. श्री. पुजारी

## १२. त्या तीनमूर्ती पैकी तर ही एक मूर्ती नव्हे !

अंगावर गळबंदी लांब कोट. मानेभोवती जरीकाठी उपरणे. डोक्यावर ठेवणीतील जरीच्या काडीचा रुमाल .... शिरडीचे गांवकामगार वतनदार कुलकर्णी गावाच्या वेशीशी उभे होते. निमगावच्या दिशेने मधून मधून पाहात होते. स्वतःशी म्हणत होते. अजून कसा नानासाहेबांचा टांगा दिसत नाही ! सूर्योदया बरोबर आम्ही शिरडीत आहोत असे समजा असे नानासाहेब म्हणाले होते. आता तर सूर्योदय होण्याची घटका अगदी जवळ येऊन ठेपली.

एवढयात वेशीशी कोणी एक वृद्ध गृहस्थ आले. नेहमीच्या आपल्या पध्दतीनुसार त्यांनी कुलकर्ण्यांकडे चौकशी केली, "काय अप्पा ! उठल्या उठल्याच वेशीत कोणाची वाट पहाता ? कोणी अंमलदार तालुक्यावरून येणार आहेत वाटते !"

अप्पांनी निमगावच्या दिशेने पुन्हा एकदा पाहून घेतले. मनाचा अस्वस्थपणा दडवीत ते म्हणाले, " होय. नानासाहेब चांदोरकर म्हणून नगरच्या कलेक्टरांचे चिटणीस आहेत, ते येणार आहेत. परंतु दप्तर तपासणीसाठी नव्हे.
बाबांच्या दर्शनासाठी."

'अस्से ! अस्से !' असे म्हणत, मान खाली घालून ते गृहस्थ निघून गेले. जणू त्यांना म्हणायचे होते; मोठी मोठी अंमलदार माणसे बाबांच्या निमित्ताने येथे येऊ लागली आहेत. त्यातीलच हे कोणी एक अंमलदार ! कुलकर्ण्यांना दोन दिवसांपूर्वीचा प्रसंग स्मरला.

दप्तर घेऊन मामलेदारांच्या हुकुमाप्रमाणे ते कोपरगावास गेले होते. तेथे तालुका

कचेरीत दप्तर तपासणीचे काम जोरात सुरू होते. स्वत: कलेक्टर साहेबांचा मुक्काम पडला होता. त्यामुळे सर्वांची धारण पाचावर बसली होती. कोणत्या वेळी कोणते प्रकरण निघेल आणि कोणास धारेवर धरले जाईल याचा नेम नव्हता.

स्वत: कलेक्टर इंग्रज मनुष्य. सर्वसामान्य प्रकरणे नेटिव्ह अधिकाऱ्यांवर सोपविलेली त्यामुळे भाषेचा प्रश्न नडत नसला तरी मनात धोका मोठा. भल्या भल्यांची फॅ फॅ उडावी असा सर्व मामला.

चिटणीस नानासाहेब मूळचेच सुस्वभावी. सभ्य. परंतु सरकारी कामात ढिले नव्हते. मोठेच विलक्षण जागरूक. अष्टावधानी. त्यामुळे त्यांचा वचकही मोठा. सत्य परिस्थिती एखाद्याच्या तोंडून आपोआप बाहेर पडावी अशीच तपासणीची त्यांची एकंदर रीत-पद्धत. खाक्या. तिच्यातून कोण सूटणार?

अनेक गावकामगार कुलकर्ण्यांपैकी मी एक. माझा नंबर लावून मी बसलो होतो. काम नानासाहेबांपुढेच होते. मनाशी म्हणत होतो; माझ्यापरीने मी दप्तर चोख ठेवले आहे. तरी पण कामात केव्हा, कोणती कसर निघेल नेम नाही. तथापी मनास एका गोष्टीचा धीर आहे. तो म्हणजे ती दयाळू साईमाउली नित्य माझ्या पाठीशी आहे.

माझे काम पाहून नानासाहेबांनी मला जाण्याची आज्ञा केली. तरी पण काम दप्तर काखेस लावून मी क्षणभर थांबलो. मान खाली करून म्हणालो, "साहेबांच्या चरणी एक नम्र प्रार्थना करण्यासाठी मुद्दाम थांबलो होतो."

नानासाहेबांचे डोळे मोठे झाले. कर्तव्यदक्षतेमुळे उग्र झालेला चेहरा अधिकच उग्र भासला. तीव्रपणे ते म्हणाले, "प्रार्थना? कसली प्रार्थना?"

माझ्या मनात कोणताही स्वार्थ नसल्यामुळे मी म्हणालो,
"आपण एकवार शिरडीस साईमहाराजांच्या दर्शनास यावे. इतक्या जवळ आल्यासारखे दर्शनाचा योग यावा, ही खुद्द बाबांची इच्छा."

बाबांची इच्छा!

मी शिरडीस येऊन बाबांचे दर्शन घ्यावे अशी बाबांची इच्छा!

अशक्य! सर्वस्वी अशक्य! निखालस खोटे!

ज्याचे मुखही कधी बाबांनी पाहिले नाही, अशा मला बाबा दर्शनाला कधी बोलावतील! या गावकामगार कुलकर्ण्यांबरोबर निरोप देतील!

वरिष्ठांना खूष करण्याचा हा काही तरी डाव! त्याविना सलगी करण्याची ही डोकेबाज मसलत या कुलकर्ण्याला सुचणार नाही.

नानासाहेबांच्या डोक्यात काय काय विचार आले ते मी कसे सांगू? पण एक गोष्ट खरी : त्यांनी मला एका शब्दानेही छेडले नाही. उलट माझ्या चेहऱ्यावरील खरे खोटेपणा निरखीत ते म्हणाले, "तुम्ही थोडावेळ बाहेर थांबा . नंतर तुम्हाला बोलावून मी काय ते सांगेन."

दरम्यान तेथे आलेल्या नानासाहेब डेंगळयांचे व त्यांचे काय बोलणे झाले न कळे. कारण त्यांनी मला आत बोलावले आणि ते म्हणाले, "तुमच्या त्या साईबाबांची इच्छाच जशी दिसते तर करणार काय! येऊ आम्ही शिरडीला! परवा सकाळी! अगदी सूर्योदयाबरोबर!"

तो सूर्योदय होण्याची वेळ टळून गेली म्हणून डोळयांवर हात धरून कुलकर्णी पहातात तो डेंगळयांचा दोन घोडयांचा घरचा टांगा त्यांना शिवाच्या ओढयापर्यंत आलेला दिसला. तो पाहून कुलकर्ण्यांचे धाबे न कळत दणाणले. तरी पण स्वतःला सावरून मनाशी ते म्हणाले: अरे बाबा! शिरडी गावच्या वतनदार कुलकर्ण्या! सरकारी अंमलदारांचा धाक मनाशी अजून किती दिवस बाळगशील! जे खरे सरकार, ते हे नव्हे. दुसरेच आहे. खरे सरकार द्वारकामाईत मशिदीत बसून राज्य करीत आहे.

पाहता पाहता टांगा वेशीशी आला.

समोर टांगेवाल्या जवळ नानासाहेबांचा पट्टेवाला. मागील बाजूस नानासाहेब चांदोरकर आणि नानासाहेब डेंगळे.

कुलकर्ण्यांनी पुढे होऊन मोठया अदबीने त्यांना नमस्कार केला. म्हणाले, "टांगा आधी आमच्या घराकडे वळवा. तेथून हातपाय धूवून मशिदीकडे दर्शनासाठी लगेच जाता येईल." कशी कोण जाणे, कुलकर्ण्यांच्या या वेतास ती मंडळी एकदम तयार झाली.

टांगा कुलकर्ण्यांच्या दारासमोर सोडून, हातपाय धुवून ती मंडळी मशिदीपुढे येऊन उभी राहिली.

मशिदीपुढे बाबांची धुनी या क्षणीही नित्याप्रमाणे प्रदीप्त होती. तिच्या पासून काही अंतरावर एका कोपऱ्यात मातीची एक थाळी आणि पत्र्याचे एक टमरेलही दोन्ही भिंतीशी होती. त्याना सोबत करीत दोन तीन मडकी जवळच विसावली होती.

जमिनीच्या उंच सखलपणामुळे ती मडकी अर्धवट कलंडून पुन्हा स्थिर झाली होती.

नानासाहेब चांदोरकरांनी मशिदीच्या आढ्याकडे पाहिले.

आढे जवळ जवळ खाली आले होते. एखाद्या कबूतराच्या पायांच्या साध्या स्पर्शानेही माती खाली पडत होती. तरीही त्या आढयास कोणी एका भक्ताने एक घंटा आणून टांगली होती. जणू ही मशीद नसून हे एक मंदिर होते. येथील देव मनुष्य रूपाने इकडे तिकडे वावरणारा असला तरी नवसास पावणारा होता.

भारतीय संस्कृती, इतिहास आणि तत्त्वज्ञान यांच्यावर पोसलेले नानासाहेबांचे सुसंस्कृत मन एका क्षणात भूतकाळांत वावरू लागले.

ही शिरडी म्हणजे पुरातन काळाची शीलधी. गंगेच्या म्हणजे गोदेच्या काठचे विद्या आणि कला यांचे एकेकाळचे हे माहेर घर, दक्षिणेस पैठण आणि उत्तरेस काशी यांच्या प्रमाणेच असलेली ही पवित्र भूमि, ती मध्यंतरीच्या काळात उध्वस्त झाली. तिचे मूळ वैभव लोपले. काप जाऊन भोके उरावीत त्याप्रमाणे आज शिल्लक उरले तें एक गावकूस ! आणि दूसरी म्हणजे गावाची वेस !

श्रीकाशीस विश्वेश्वराच्या मंदिराची मशीद झाली.

ही मशीद त्या प्रकारची तर नसेल !

या साधूने घेतलेला फकीराचा हा वेष मशिदीस साजेसा दिसावा म्हणून तर घेतला नसावा.

तसे नसते तर ही आढयाची घंटा, हे अग्निहोत्र येथे कसे दिसले असते ? नानासाहेब, डेंगळे सांगतात त्याप्रमाणे रामनामाचा जप तरी येथे कसा चालला असता ?

ही मशीद म्हणावी, तर ती हिंदूच्या भर मध्यवस्तीत कशी ? बरे, मंदिर म्हणावे तर ते मूर्तीविना असलेले, मशीद म्हणून ओळखले जाणारे स्थान कसे ?

छे: ! ही मशीद म्हणजे एक गौडबंगालच आहे.

दिङमूढ होऊन नानासाहेब इकडे तिकडे पाहू लागले. तोच त्यांच्या कानावर शेजारच्या घरातून कसलासा गलबला आला.

ती एक शाळा होती. तो गलबला शाळेतील मुलांच्या बोलण्याचा होता. शाळा मशिदीच्या भिंतीला लागूनच होती.

मशिदी समोर नानासाहेब डेंगळयांना पाहून मास्तर धावतच बाहेर आले. नानासाहेब चांदोरकरांना नमस्कार करून स्वतःची ओळख करून दिली, "मी माधवराव देशपांडे. या गावचाच आहे. समोरच्या मुलांच्या शाळेत मास्तर आहे."

मास्तरांच्या वाणीत नम्रता होती. अंगी दुसऱ्यावर छाप टाकण्याइतकी हुषारी होती. आलेली माणसे बाबांच्या दर्शनासाठी आली आहेत हे ओळखून झटकन मास्तर बाजूस झाले, दोन्ही हात जोडून आर्जवीपणे म्हणाले,

"बाबांच्या दर्शनासाठी आपण आला आहात. चला मी घडवितो त्यांचे दर्शन."

बाबा यावेळी पाठमोरे होते. धुनीत ढलपे टाकण्याचे काम चालले होते. जणू त्यांना बाहेरील जगाची शुद्ध नव्हती. भल्या पहाटे उठून कोणी मंडळी आपल्या दर्शनास आली याची दादही नव्हती.

नानासाहेब डेंगळे प्रथम पुढे झाले.

बाबांसमोर धुळीत साष्टांग नमस्कार घालून त्यांच्या पायावर त्यांनी डोके ठेवले.

नानासाहेब चांदोरकर उभ्या उभ्याच विचार करू लागले :

जिच्या पायांवर मोठ्यामोठ्यांनी धुळीत लोटांगण घातले अशी ही विभूति आहे तरी कोण ? आली तरी कोठून ?

रात्री नानासाहेबांशी जे बोलणे झाले त्यावरून तरी ही विभूती गूढ दिसते. तिचा येथे येण्यामागील हेतूही गूढ असावा.

दत्तावतार श्रीमाणिकप्रभूंनी मोंगलाई हे आपले कार्यक्षेत्र केले. अक्कलकोट स्वामींनी अक्कलकोट हा आपल्या कार्याचा केंद्र बिंदू केला. राम असो रहीम असो, ईश्वर सर्वत्र एक, ही एकेश्वर पंथाची ध्वजा उभी करून समाजातील दूही नाहीशी केली. मनामनातील मलिनता धुवून काढून समाज एकसंघ केला. खऱ्या मानवधर्माची गुढी उभी करून महाराष्ट्र धर्माची उन्मळून पडत असलेली मुहूर्तमेढ पुन्हा स्थिर केली, बळकट केली.

श्रीमाणिकप्रभूंनी मुसलमान समाजाचा प्रेमादर संपादन केला. श्रीस्वामीसमर्थांनी अक्कलकोट येथे याच समाजासाठी भक्तिप्रेमाची पाणपोई घातली. त्यांचेच उरलेले कार्य पुरे करण्यासाठी तर आता ही विभूती येथे फकीर वेषाने अवतरली नाही ना ?

श्रीमाणिकप्रभूंच्या माणिकनगर येथील दरबारात अवतरलेल्या त्यादिव्यरूप त्रिमूर्तीचे स्मरण नानासाहेबांना या क्षणी झाले.

स्वर्गीय तेजाने तळपणाऱ्या तीन मूर्ती पैकी एक स्वतः श्रीमाणिकप्रभू होत. दुसरे श्रीस्वामीसमर्थ होते. तिसरी मूर्ती मात्र त्यावेळी कोणासच ओळखता आली नाही. त्या तिघांमधील गूढ भाषणाचे आकलन त्यावेळी कोणासही झाले नाही. त्या तीन मूर्ती एका टेकडी पाशी एकमेकांना भेटल्या ; आपल्या अंगीकृत कार्याविषयी एक-मेकांशी काही शब्द बोलल्या आणि एका क्षणात पुन्हा अदृश्यही झाल्या.

धुळीत एका तरटावर बसलेल्या त्या मूर्तीकडे नानासाहेबांनी एक क्षणभर पाहिले. टक लावून पाहिले.

विषयवासनेची यत्किंचितही काजळी नसलेली वैराग्याची ती जणू ज्योती होती, विघ्नहर्त्या श्रीगजाननाची ती जणू मंगल मूर्ती होती. उत्पत्ति, स्थिति आणि लय जिच्या हाती, अशी ती साक्षात् त्रिमूर्ती होती.

एका क्षणात एक दिव्य विचार नानासाहेबांच्या मनात चमकून गेला. भक्ति भावाने भारावून, अष्ट सात्विक-भावांमुळे कंपायमान होऊन स्वतःशीच म्हणाले : त्या तीन दिव्य मूर्ती पैकी तर ही एक मूर्ती नव्हे ! जिने आजवर गूढत्व धारण केले, ती आता येथे तर आपल्या कार्यासाठी येऊन प्रकट झाली नाही. !

नानासाहेबांनी धुळीतच त्या मूर्तीला साष्टांग नमस्कार घातला.

दोन्ही डोळ्यांतून भक्तिप्रेमाचा अश्रुप्रवाह सुरू झाला.

नानासाहेब उठून बसले तेव्हा त्यांना रात्रीचे नानासाहेब डेंगळ्यांचे उद्गार आठवले. नानासाहेब डेंगळे रात्री म्हणाले होते, " ज्यांना बाबांनी एकदा आपले मानले, अशा माणसांना बाबा कोणत्यावेळी, कोणत्या कारणामुळे, कोणत्या व्यक्तींकरवी आपणाकडे खेचून घेतील याचा काही नेम नसतो. "

गावकामगार केशव अनंत ऊर्फ अप्पा कुलकर्णी यांच्या शब्दावर आपण अविश्वास प्रकट केला, अधिकाराच्या तोऱ्यात त्यांनी आणलेल्या निरोपाची हेटाळणी केली

याचा चांदोरकरांना आता पश्चात्ताप झाला. केवळ अज्ञानामुळे हातून घडलेल्या ह्या अपराधाबद्दल त्यांनी बाबांची मनोमन क्षमा मागितली. म्हणाले : सद्गुरो ! स्वामी ! खरे अंमलदार आपण आहा. आम्ही आपले हुजरे. शागीर्द. भालदार-चोपदार. आमच्या अनंत अपराधांची क्षमा आपण करणार नाही तर दुसरे कोण ?

मशीदीतून बाहेर पडताना नानासाहेब चांदोरकरांना म्हणाले की आपल्या मनावर चढलेली अंमलदाराची पुटे हळू हळू गळून पडत आहेत. अहंकाराच्या हजारो बंधनामुळे जखडलेले मन हळू हळू मुक्त होत आहे. झोपलेल्या आत्म्याला हळू हळू जाग येत आहे.

नानासाहेब चांदोरकर दीर्घमौनानंतर एकच वाक्य बोलले, "आज गंगेचे स्नान घडले; विश्वेश्वराचे दर्शन झाले."

**१३ माझे देऊळ बांधतोस ! शनिदेवाचे देऊळ पडले, ते बांध .**

अप्पा कुलकर्ण्यांच्या घरी विश्रांती घेत असताना एकाच विचारामुळे चांदोरकरांचे मन व्यग्र झाले. पुन्हा पुन्हा ते स्वतःशी म्हणू लागले : जे स्वतः पूर्ण निःसंग, त्यांनी आपले दर्शन मुक्तद्वार का करू नये ? दर्शनाच्या लाभासाठी त्यांनी कोणा व्यक्तीस मध्यस्थ का करावे ? काहींना तर आपल्या दर्शनासाठी मशिदीची पायरीसुध्दा का चढू देऊ नये ? सर्वजण जर त्यांचीच लेकरे तर हा भेदाभेद तरी कशासाठी ? या निर्बंधामागील हेतू तरी कोणता ?

सकाळी भेटलेले बाबांचे दर्शन करविणारे शाळामास्तर श्री. माधवराव देशपांडे यांच्याविषयी चांदोरकर विचार करू लागले. नानासाहेब डेंगळ्यांच्या म्हणण्याप्रमाणे बाबांच्या सान्निध्यातील ही एक अत्यंत महत्त्वाची व्यक्ति. ती व्यक्ती या बाबतीत काय म्हणते ते तरी ऐकावे असे त्याना वाटू लागले. मधूनच बैठकीवरून उठून हात मागे घेऊन ते येरझारा घालू लागले. त्यांची ही मनःस्थिति ध्यानी घेऊन नानासाहेब डेंगळे म्हणाले, "मशीदीतून आल्यापासून मी पहात आहे. आपण विचारात गढला आहात. कोणत्या शंकेने आपणास एवढे अस्वस्थ केले आहे ?"

चांदोरकर हसून म्हणाले, "संशय हा तर आमच्या मनाचा स्थायीभाव. संशयाचे पिशाच्च इंग्रजी शिक्षणामुळे आमच्या मानेवर सदैव बसलेले. मघाच्या त्या माधवराव देशपांडे मास्तरांची भेट झाली तर पुष्कळ गोष्टींचा खुलासा होईल असे वाटते."

अप्पा कुलकर्ण्यांकडील एक मनुष्य ताबडतोब माधवरावांकडे धावत गेला.

शाळेच्या सकाळच्या कामातून माधवराव आता मोकळे झाल्यामुळे त्यांना पाठोपाठ घरी घेऊनच आला.

इकडचे तिकडचे बोलणे झाल्यानंतर माधवराव स्वतःच बाबांविषयी बोलू लागले बाबांच्या स्वभावात वर वर दिसणाऱ्या विसंगतीची संगती लावू लागले. स्वतःकडे उणेपणा घेऊन त्यांनी बोलण्यास सुरुवात केली.

"साहेब! प्राथमिक शाळेचा मी एक मास्तर. माझे ज्ञान ते केवढे! पण बाबांनी मला जवळ केले. आपल्या वेड्याबागड्या पोराला आईने जवळ करावे तसे.

"तंबाखू ओढण्याची माझी सवय फार जुनी. सकाळी शाळेत मुलांना शिकवीत असताना सुध्दा मला तंबाखूची तलफ येई. मी अगदी बेचैन होई, तशातूनच एक दिवस बाबांकडे जाण्याचा मार्ग सुचला.

"बाबांना त्यावेळी गावात फारसे महत्त्व नव्हते. मशीद हा छानसा आडोसा होता. तेथे बाबांची आणि माझी चिलिमची देवघेव छान जमली. मी त्यांचा दोस्त झालो पुढे तर त्यांना एकेरीने संबोधू लागलो.

"पण पुढे ध्यानी आले की चिलीम ओढणे हे आम्ही एकत्र येण्याचे केवळ निमित्त होते. कारण मोठ्या खुबीने बाबांनी मला आपल्या जवळ ओढून घेतले होते. कधी कधी दहा मिनिटेही बाबा माझ्याकडे नुसते पहात बसत. भरलेली चिलीम हातात तशीच धरून, भान विसरून मीही त्यांच्याकडे जणू त्यांचे माझे संबंध फार जुने होते कदाचित कित्येक जन्माचेही. "हळू हळू जणू खरी ओळख पटू लागली. त्यांच्या सहवासाची चटक लागली. शाळा असो नसो - अष्टौप्रहर मन एखाद्या भुंग्याप्रमाणे त्यांच्याभोवती रुंजी घालू लागले मी शाळामास्तर, म्हणून बाबा मला 'शामा' 'शाम्या' या प्रेमाच्या नावाने बोलावू लागले. जणु मी त्यांच्या कुटुंबातीलच एक मनुष्य होतो."

माधवराव क्षणभर गहिवरले. बोलण्याचे थांबले

नंतर विषय बदलल्या प्रमाणे बोलू लागले —

"बांबांना लोक मुसलमान समजतात, मशीद हे त्यांचें राहाण्याचे ठिकाण अशा बाबांबद्दल बायजाबाईना इतका कळवळा का असावा? त्यांच्या मुलानेही बाबांच्या तोंडात आपल्या खिश्यातील साखरकाजू घालून एखाद्या सख्ख्या भाच्याप्रमाणे त्यांच्यावर प्रेमाचा अधिकार का गाजवावा? त्यांच्या हाताला धरून त्यांना हवे तेथे ओढत का न्यावे? या आपल्या मामाने ती जीर्ण कफनी पुन्हा अंगावर घातल्यास बोटे घालून ती टराटरा

फाडून टाकण्याची धमकी का द्यावी ?

"साहेब ! पूर्वजन्मीचे हे संबंध ! याविना या गोष्टींना दुसरे उत्तर नाही. अन्यथा अनेकाना ज्यांचा धाक ; ज्यांच्या धाक ज्यांच्या मशीदीची पायरी चढण्याची मी मी म्हणणारांची छाती नाही. असे बाबा मुलांना आईच्या आज्ञेत रहावे तसे बायजाबाईच्या आज्ञेत राहिले नसते. आपली कडक बंधने बायजाबाईच्या बाबतीत त्यांनी शिथिल केली नसती.

" आता कित्येकाना वाटते बाबा आपल्या बाबतीत फार कठोर झाले. आपली सत्व परीक्षा त्यांनी फार पाहिली. पण खरे ते सांगतो. त्यांना सुधारण्यासाठीच बाबांनी तो कठोरपणा धारण केला. वर्गाच्या मागे राहिलेल्या मुलाला घंटा झाल्यानंतर ही शाळेंत बसवून घेऊन त्याच्याकडून कच्चा राहिलेला भाग मास्तरांनी पक्का करून घ्यावा त्याप्रमाणें !"

माधवरावांचे हे विनोदी बोलणे ऐकून नानासाहेबांना हसू आले. अप्पा कुलकर्णीही मुद्दा पटल्यामुळे हसले.

नानासाहेबांच्या हसण्याशी समरस होऊन माधवराव पुढे सांगू लागले —

" काशीराम शिंपी म्हणून बाबांचा येथील एक खरा भक्त. मोठा सात्त्विक वृत्तीचा तो बाबांना रोज दोन पैसे न चुकता देई. याच गोष्टीचा पुढे पुढे त्याला इतका सात्त्विक अहंकार झाला की एखाद्या दिवशी बाबांनी पैसे घेतले नाहीत तर तो माझ्याकडे येऊन डोळ्यातून पाणी काढू लागला.

" बाबांनी हा कच्चेपणा ओळखला आणि रोज त्याच्याकडे पैसे मागण्याचा सपाटा लावला. केव्हा ? तर त्याची पैचीही पत बाजारात उरली नाही अशा वेळी ! या सर्व प्रकाराने काशीराम मनात समजला की सात्त्विक झाला तरी अहंकार परमार्थाला मारकच.

" त्या क्षणापासून काशीरामाच्या मनातील 'मी' मेला. जीवंत उरला तो त्याच्या मनातील राम ! साईराम !

त्या साईरामानेच त्याला प्राणसंकटातून पार केले.

कारण काशीराम तिकडे चोरांच्या तावडीत सापडला त्या रात्री बाबांनी इकडे मशिदीत एकच हाःहाः कार केला. रुद्रावतार धारण करून, ओरडून आणि शंखध्वनी करून सर्व मशीद डोक्यावर घेतली.

"साहेब ! खरे तेच सांगतो, बाबा हे एक मोठेच गूढ आहे. म्हाळसापती अख्खी रात्र हात जोडून त्यांच्या पायांशी बसलेले असतात. त्यांची प्रत्येक आज्ञा 'होय देवा !' म्हणून शिरसावंदय मानतात; पण त्यांनाही बाबांच्या मनाचा थांग नाही. बाबांची आज्ञा केव्हा काय होईल माहित नाही — माहित नसते.

"मशीद इतकी जीर्ण झाली. ती पाडून दुसरी बांधावी म्हणून गोपाळराव गुंडांनी कोपरगावच्या पूर्वीच्या मुलकी सर्कल इन्स्पेक्टरानी सर्व तयारी केली उत्तम दगड आणून तो रात्रंदिवस घडविला. सर्वांना वाटले या मशिदीच्या जागी एक सुंदर वास्तू उभी राहील. मंदिराचे स्वरूप तिला येईल. पण झाले मात्र उलटेच. बाबांनी एक दिवस सकाळी मशिदीतून बाहेर येऊन रागारागाने ते दगड उचलून फेकून दिले आणि म्हणाले, माझे देऊळ बांधतोस ! मला येथे गाडतोस ! जा, देवाचे देऊळ बांध ! शनिदेवाचे देऊळ पडले आहे. ते बांध !"

"बाबांच्या आज्ञेने गोपाळरावांनी ते दगड उचलले आणि पडत चाललेल्या शनीच्या देवळाचा जीर्णोद्धार केला. ते वाढविले. नंतर ध्यांनी आले की शनीच्या देवळाचा जीर्णोध्दार व्हावा म्हणूनच त्या सकाळी बाबांनी तो अवतार धारण केला."

माधवराव एक क्षण भर स्तब्ध झाले.

मग म्हणाले, "बाबांचे वागणे पाहून कधी कधी मला माझ्या लहानपणातील मास्तरांची आठवण येते. त्यांचा स्वभाव जितका रागीट तितकाच प्रेमळ.

"कोणत्या मुलाला कोणते काम सांगावे; कोणत्यावेळी रागवावे आणि कोणत्या वेळी चुचकारावे ; छडी झाली तरी तिचा उपयोग कोणत्यावेळी आणि किती प्रमाणात करावा—या सर्व गोष्टींचे तारतम्य त्यांना मोठे ज्ञान .

एखाद्या गोष्टीच्या द्वारा त्यांनी दिलेली मात्रा इतकी अचूक लागू पडे की रोगाचा बंदोबस्त कायमचा !

"बाबांचे वागणेही थोडे फार असेच ! लावलेला धाक कामे नीटपणे करून घेण्यासाठी. परंतु एकंदरीत सर्व गोष्टी धारवाडी काटयाप्रमाणे अचूक काटेकोर. शिस्तबद्ध. जणू बाबांना या काटयावर सोने जोखायचे आहे."

बाबांविषयी आपण फार बोललो असे माधवरावांना वाटले की काय न कळे. कारण ते लगेच उठले. म्हणाले, "अजून अंघोळ, पूजा इत्यादी व्हायचेच आहे. बाबांचे एक भक्तही आज भोजनासाठी आहेत. मी येतो. रजा घेतो."

माधवराव घाईघाईने घरी निघून गेले.

नानासाहेब डेंगळे आणि नानासाहेब चांदोरकर माधवरावांच्या बोलण्याचा विचार करीत निमगावी जाण्यासाठी अंगावर कोट चढवू लागले.

# सुहागशहा

ले. डॉ. के. भ. गव्हाणकर, कुर्ला.

जीवाचे हित अचूक जाणणारे संत होत. स्वहिताच्या बरोबर जीवाची पाऊले पडतील असेच त्यांचे शब्द असतात. त्यांच्या बोलण्यामध्ये संदिग्धता नसते, त्यांच्या वचनात गुंतागुंती नसते, त्यांच्या भाषणात आडपडदा नसतो.

मतामताच्या गलबत्यात जीवनाचा घोटाळा उडतो, खऱ्या खोट्यांच्या निवाड्यात बुद्धी भ्रमते; असल्या अवस्थेत संत मार्गदर्शक होतात.

संतवाणी नामस्मरणामुळे गोडावलेली, प्रेमाने ओथंबलेली असते. त्या वाणीत अपूर्व तेज असते. त्या वाणीचा अनुभव संत निळोबा असा सांगतात.

बोध प्रत्ययाची वाणी । गर्जवीती गुणी श्रीहरीच्या ।
ऐकती त्यांचे पाप । निरसे ताप त्रिविध ।।

परमेश्वराचे अस्तित्व सर्व ठिकाणी आहे. त्याचे भक्त प्रत्येक जातीत आहेत. त्यांना ओळखणारे डोळे अनुभवाचे, प्रेमभक्तीचे पाहिजेत.

चैतन्य सर्व ठिकाणी भरलेले आहे. ते कोठेही प्रगट होऊ शकेल. त्याला प्रगट करणे आपल्या भावनेवर अवलंबून आहे. ज्याची भावना खरी शुद्ध म्हणजे निःसंशय असते त्याला दगडाची मूर्ती देखील देव बनते. भावना शंभर नंबरी पाहिजे. त्यामध्ये कसलीही भेसळ उपयोगाची नाही.

ज्याच्यावर आपली आसक्ति असते तेथे आपली प्रीति बसते. ज्या वस्तूवर आपली प्रीति असते. ती नेहमी जवळ असावी असे वाटते, वस्तू मिळविण्याकरिता जे अनुकूल आहे त्याचे मनापासून ग्रहण करणे याचे नाव विवेक होय, वस्तु मिळविण्यास जे प्रतिकूल, ते त्यागणे त्याचे नाव वैराग्य होय, अर्थात भक्ती देखील विवेक वैराग्य यिाशवाय होणे शक्य नाही म्हणून अशा भक्ती मधून ज्ञान जन्म पावते.

सर्व रूपे देवाची आहेत असे वेदांत सांगतो. मग भिन्नपणा कोणता ?

त्या स्वरूपात ज्या क्रियेचे स्मरण ती क्रिया वेगळी वाटते. जे स्मरण असते तसा भोग घडतो. वेश्येचे स्मरण तेच वेश्या कर्म होते वा वेश्यारूप होय. वेश्येलाही भगवंताचे जेव्हा स्मरण तेव्हा तिचे वेश्याकर्म विसरून भगवंतपणा तिच्यामध्ये जागे. स्मरण जसे पालटेल तसे जीव (म्हणजे प्रतीति) रूप पालटत असते. जीवाला जीव केव्हां म्हणावयाचे तर त्याला विषयाचे स्मरण असते तेव्हा जीवत्व तेथे जागे आहे. त्या जीवत्वात देवाचे (प्रियत्वाचे) स्मरण झाले की तोच देव.

सुहाग शहा हा एक मोठा भक्त होऊन गेला. हा अहमदाबादेस राहात असे. तो हिजडा होता.

प्रेमाने दिवस रात्र देवाचे भजन करी. सुहागशहाची समाधी (त्याला सुहाग शहाचा दरगा म्हणतात) अहमदाबादेत आहे व तो नवसाला पावतो म्हणून लांब लांबचे लोक येतात. सुहाग शहा हा जन्मत: नपुंसक न स्त्री असा होता.

जो सर्व देहात व्यापक असून कोणत्याही कर्माला लिप्त नसतो, त्या शेषशाई लक्ष्मीकांतास सुहागशहा ध्यात असे. त्याचे जातवाले नगरात फिरत, पण तो कोठे न जाता घरीच भजनात नामस्मरणात दंग असे. पुढे त्यास साक्षात्कार झाला तेव्हापासून शेषशायी सगुणरूपाने त्यास वारंवार भेटत असे.

काही दिवसानंतर त्या देशात अवर्षण पडले. तेव्हा पुष्कळ लोक अन्नान करून मेले. पावसाकडे सर्वांचे डोळे लागलेले होते. राजाने पाऊस पडावा म्हणून अनुष्ठाने केली. सात दिवस उपास केले. तेव्हा देवाधिदेव लक्ष्मीकांत याने ब्राह्मणाच्या रूपाने त्याच्या स्वप्नात जाऊन दृष्टांत दिला की सुहाग शहा भक्त एका हिजड्याच्या घरी राहिला आहे, त्याला तू निरभिमानाने शरण जाऊन साष्टांग नमन कर; म्हणजे विश्वाचा प्रतिपाल करणारा श्रीहरि संतुष्ट होऊन पर्जन्य वृष्टी करील. हा दृष्टांत राजाने लोकांना सांगितला, तेव्हां त्यांनी नमस्कार करण्यास अनुमोदन दिले.

मग राजा पुष्कळ लोक घेऊन सुहाग शहाकडे गेला. त्याने त्यास संपूर्ण वृत्तांत निवेदन केला, आणि कृपाकरून जनांचे दु:ख निवारण करण्याची प्रार्थना केली. शेवटी हात जोडून साष्टांग नमस्कारही घातला. तेव्हा तो म्हणू लागला, देवा ही उपाधि माझ्या मागे का लावलीस ? सर्व जीवात कुलक्षणी, नीच, मी, तू काय करशील कळत नाही !

मग तो अंगणात उभा राहून वर पाहू लागला पण पाऊस पडला नाही, नंतर त्याने नेत्र लावून श्रीविष्णूचे ध्यान केले तरी पर्जन्य पडेना. मग त्याने त्राग्याने आजपासून

हरिभजन न करण्याचा नेम करून नाकातली नथ काढून घेतली व हातातल्या बांगड्या टिचवू लागला. तोच श्रीहरि प्रसन्न झाले व तात्काळ पर्जन्य वृष्टी झाली. लोकांनी त्याचा जयजयकार केला. पुढे १४ दिवस एकसारखा पाऊस पडत होता.

राजाला फार आनंद झाला व त्या आनंदाने बेहोश झालेल्या राजाने काही मागण्यासाठी सुहागशहास सांगितले. तेव्हा तो म्हणाला "राजा! आम्ही श्रीहरीचे दास. सर्व सिद्धी हात जोडून आमच्याजवळ उभ्या आहेत. तर तू आम्हास काय देणार? राजा! याच्यामुळे जनात उपाधी मात्र वाढणार यास्तव मी समाधि घेणार व ही नाशिवंत काया सोडणार! तरी ह्या गोष्टीची तयारी कर"

मग अधिकाऱ्याने गार खणविली, तीमध्ये तो उभा राहिला व श्रीविष्णूचे चिंतन केले तेव्हा देवाने त्यास भेट दिली.

ही बातमी गावभर झाली. लोकानी फुलें बुक्का उधळला. वैष्णव लोक भजन करु लागले. "तेव्हा माझ्या दीक्षेचा अंगिकार केला असता, भवव्यथा नासेल," असे सुहाग शहा म्हणाला. पण निंद्यवेष म्हणून कोणी धजेना. इतक्यात एक गरीब पुढे येऊन त्याच्या पाया पडला.

सुहाग शहाला आनंद झाला व आपला पंथ घेणारा एक तरी प्रभूचा लाल भेटला असे सुहाग शहाला वाटलें त्याने त्याला उपासनामंत्र सांगितला, कांकणे काढून त्याच्या हातात घातली व नाक टोचून नथ घातली. आणि श्रीविष्णूचे रूप ध्यानात आणून नामस्मरण करीत प्राण सोडला, धन्य सुहाग शहा आणि त्याचा तो शिष्य हा सांप्रदाय अद्यापही चालू आहे.

परमेश्वर काळ, वेळ, ज्ञान, कूळ, काही न पाहाता भक्तास पावतो.

श्रीसाईलीला मे १९७४ अंकात वाचा

## श्रीसाई भक्तांचे श्रद्धास्थान

गिरगावातील श्रीसाईधाम

# अयोध्या

श्री. वि. के. छत्रे

मर्यादा पुरुषोत्तम म्हणून ज्याची जगभर ख्याती आहे, ज्याच्या अद्भूत चरित्राचे भाषांतर अनेक विदेशीयांनी आदर पूर्वक आपापल्या देशी भाषात केले आहे, व ज्याच्या केवळ अखंड नामस्मरणाने असंख्य अनन्य भक्त आजपर्यंत उद्धरून गेले, अजरामर झाले, त्या श्रीरामांची अयोध्या नुसती पहाण्याचा नव्हे तर तेथील अपूर्व रामजन्मोत्सवाचा विशेष आनंद लुटण्याचे भाग्य शके १८९५ चैत्रात मला लाभले.

'भारती परिषद प्रयाग या संस्थेकडून वार्षिक अधिवेशनासाठी २४ मार्चला उपस्थित राहण्यासाठी मला एक संस्कृत पंडित म्हणून आदरपूर्वक निमंत्रण आले. ऑक्टोबरमध्ये दिल्ली हरिद्वारचा यशस्वी दौरा, गुरुकुल कांगडी विद्यापीठाचे कार्य प्रत्यक्ष पाहण्यासाठी मी नुकताच करून आल्यामुळे पुन्हा लांबच्या प्रवासाला जाण्यास प्रकृतीच्या कारणाने व वार्धक्यामुळे मी एऱ्हवी तयार झालो नसतो. पण विद्वानांच्या संगतीचा अपूर्व लाभ, प्रयागहून जवळच असलेल्या काशीविश्वेश्वराचे पुन्हा दर्शन गोरखपुरच्या ख्यातनाम कल्याण कार्यालयाचे प्रत्यक्षावलोकन व एकाच परतीच्या रेल्वे फ्री पासात जमल्यास अयोध्यादर्शन ही घडतील, वसंत ऋतु असल्यामुळे प्रकृतीस प्रवास झेपण्यास अडचण पडणार नाही अशा विचाराने मी परिषदेला जाण्याचे निश्चित केले. सत्य 'संकल्पाचा दाता नारायण' याचा गोड अनुभव लौकरच आला.

रेल्वेपास मला पाहिजे ती ठिकाणे व इष्ट त्या क्रमाने धारण करणारा मिळविणे व इष्ट त्या तारखेस काशी एक्सप्रेसला रिझर्व्हेशन करणे ही कष्टमय कामे थोडक्या वेळांत माझ्या आळीतील एका स्नेह्याने व भाच्याने ही केली व पास माझ्या हातात घर-बसल्या पडलाही. पासावर अयोध्येचा उल्लेख करणे जमले नव्हते तरी गोरखपूरहून लखनौमार्गे परत येताना लखनऊला उतरून तिकीट काढून मागे दक्षिणेस अयोध्येस यावे असा बेत केला. इतक्यात आमच्या पेन्शनर मंडळीच्या बैठकीत सहज मी अयोध्येला जावे कसे याबद्दल पृच्छा करता एक परिचित श्री.कुलकर्णी म्हणाले 'अहो, मी अयोध्येला जाणार आहे उत्सवास ! त्याच्याकडून विशेष माहिती व उतरण्याच्या काळाराम मंदिराचा

पत्ता घेऊन ठेवला; कारण त्याच्या निघण्याची तारीख वाटेत उतरण्याची ठिकाणे निराळी होती.

प्रयाग परिषदेला उपस्थित राहून काशी गोरखपूर येथील संकल्पित प्रवचने कीर्तने भेटी गाठी इत्यादि कार्य यशस्वीरीत्या उरकून मी गोरखपुर लखनौ मार्गावरील मनकापूर जंक्शनला उतरून गाडी बदलून सुमारे केवळ ८२ पैशांचे तिकीटावर सुमारे ३०–३२ कि. मी. कटरा स्टेशनावर आलो, व तेथून रिक्षा करून अयोध्येस जाण्यास निघालो. काशी गोरखपूर प्रवासात मला ही जवळची वाट कळली. कल्याणला ही माहिती केवळ टाईमटेबलावरून कळू शकली नाहीं.

सुमारे १५ मिनिटानी रिक्षेतून शरयूमाईचे दर्शन घडताच माझ्या बालपणच्या स्मति जागृत झाल्या. श्रीमती नाथीबाई ठाकरसीनी व्यास गुजराथीतून भागवत निवेदन करणारे म्हणून माझ्या वडिलांना, केशव शास्त्र्यांना, आपले आश्रयास ठेवले होते व बाई बरोबर अयोध्येंस त्यांचा मुक्काम महिनाभर असे, असे आईच्या बोलण्यात येई (ते मला समज येण्याच्या आधीच दिवंगत झाले). ती तुलसी रामायण रोज वाचीत असे, त्या आठवणीबरोबर एका ऐकलेल्या जुन्या गाण्याचे एक कडवे मला आठवले –

शरयूतीरी अयोध्यापती तो दाशरथी ।
पतीतपावन ज्याला सीतापती म्हणती ।
श्रीराम जयराम पळविल यमाला ।
भावें नमितो पंचवटीच्या रामाला ।

माझे दोन्ही हात शरयूला वंदन करण्यासाठी तत्काळ जोडले गेले. पात्र विस्तीर्ण दिसले. पाणी वसंत ऋतूच्या मानाने भरपूर होते. नव्यानेच बांधण्यात आलेला पूल ओलांडून रिक्षा खाली उतरली व नदीच्या काठाने देवळांना वळसा घालीत डावीकडे वर चढून एका गल्लीत शिरली व थांबली. श्रीराममंदिराची पाटी पाहून खूण पटताच मी उतरलो. आत गेलो व व्यवस्थापकांना माझे नाव सांगून आगाऊ पत्र पाठविले असल्या बद्दलचेही सांगितले - त्यांनी उतरण्यास संमति दिली. सामान उतरवून घेवून रिक्षावाल्यास पैसे देऊन यथावकाश मंदिराचा सेवक मिळाल्यावर सामानासह मी व्यवस्थापकांच्या आदेशानुसार वर गेलो. सामान लावले, कपडे काढले, प्रातर्विधि गाडीतच आधी उरकला असल्यामुळे हातपाय धूवुन देवदर्शन करून व्यवस्थापकांस भेटून 'चहा मिळेल का? म्हणून पृच्छा केली. चहा मिळाला, इतक्यात मठाधिपती श्रीनथुभट्ट आसनावर बसल्याचे दिसताच त्यांस नाव सांगून वंदन केले व उत्साव संपे-

पर्यंत राहाण्याची व कीर्तन सेवेची इच्छा व्यक्त केली. त्यांनी मान हालवून सम्मती दिली. ते तेजः पुंज व ८० च्या पुढे गेलेले दिसले. थोडी विश्रांती घेऊन एका सहयात्रेकरूच्या सोबतीने शरयूवर गेलो व स्नान संध्या करून कपडे धुवून घेऊन विष्णु सहस्रनाम म्हणत परत आलो. बेडिंगची दोरी खुंट्यांना बांधून कपडे वाळत टाकले व जमलेल्या यात्रेकरूत कोणी परिचय योग्य आहे का म्हणून नजर चौफेर टाकली. जरा वेळाने पुण्याचे श्री वि. ल. शिदोरे या समवयस्काशी परिचय झाला व तो अयोध्या सोडीपर्यंत होता.

(रामजन्मोत्सवाचे वर्णन)

इतकेच नव्हे तर जडलेला स्नेह पत्रव्यवहार व्दारा अजून टिकला आहे.

मंदिराची मुख्य इमारत तीन मजली असून एका बाजूस तळमजल्यावर प्रशस्त गच्ची काढून पहिल्या मजल्याच्या समांतर नळ व संडासाची सोय केली आहे. चैत्र शु. सप्तमीस सकाळी तेथे पोहोचलो व शनिवार द्वादशी त्रयोदशीपर्यंत तो जन्मोत्सव पाहिला, फार संतुष्ट झालो. यात्रेच्या ऐनवेळी गर्दीमुळे प्रकृतिस्वास्थ्य टिकविणे अवघड जाईल म्हणून मी नवमीच्या आधीच जरा लौकर येऊन परतणार होतो; पण काशीस मुक्काम काही कारणाने वाढल्यामुळे सर्व सोहळा पाहण्याचे परम भाग्य मला लाभले ही श्रीरामरायाची कृपा.

या मंदिरात प्रायः महाराष्ट्रीय यात्रेकरूंची सोय आधी होते. दोन वेळ चहा, जरूर वाटल्यास स्नानास गरम पाणी व एक वेळ दुपारचे भोजन बहुधा २ च्या सुमारास मिळते. ठराविक चार्ज असा द्यावा लागत नाही. पण इथली उत्तम व्यवस्था पाहून प्रसन्न झालेला भाविक यात्रेकरू समजून चांगलीशी देणगी देतो व त्याबद्दल रीतसर पावती मिळते. तो पुन्हा आला नाही तरी यथाशक्ति उत्सवासाठी देणगी पाठविण्याची त्यास प्रेरणा होतेच होते. दरवर्षी जमले नाही तरी मधून मधून तो देणगी पाठवत राहतो. उत्सवात अशा दररोज मनीऑर्डर येत असतात हे मी पाहिले आहे. जेवण चहा इत्यादि सेवेसाठी व अनायासे उत्सव पहावयास मिळेल म्हणून प्रयाग-काशी इत्यादि क्षेत्रातून महाराष्ट्रीय महिला येथे येतात व त्यांनी भक्तियुक्त अंतःकरणाने सिद्ध केलेल्या अन्नास विशेष माधुर्य प्राप्त होते असा अनुभव आला. त्यामुळे व येथील विशेष हवापाण्यामुळेहि आकंठ भोजन एक वेळ उशीरा करूनही कधीहि माझ्यासारख्या वयस्कर माणसास अन्न बाधले नाही. रात्री अर्थात मी जवळ बाळगलेल्या टिकणाऱ्या शिदोरीतून अल्पाहार वा दूध चहा घेत असे. साबूदाण्याची खिचडी मला मुंबई कल्याणच्या हवेत फारशी सोसत नाही. पण तेथे मी मना पासून खात असे अजूनही माझ्या जिभेवर त्या अन्नाची रूचि खेळत आहे.

नवमीच्या आदल्या दिवशी यात्रेकरूंतून गर्भवती तरुणी निवडून तिला कौसल्या समजून वस्त्रालंकाराने नटवून भोवताली रांगोळी काढलेली आहे. समर्थी जवळच तेवत आहे. महिला वर्ग डोहाळे मधुर स्वरात गात आहेत, सनई चौघडा मंद स्वर काढीत आहे. अशा थाटात चांदीच्या ताटात तिला भक्तिभावाने जेवावयास घालतात. अशी तरुणी प्राय: मिळतेच. एकापेक्षा अधिक गरोदर तरुणी आढळल्यास तर जिचे दिवस जास्त भरले आहेत तिची निवड केली जाते. त्यादिवशी महिलांच्या पंक्ति आधी उठतात. मागाहून पुरुषांच्या, आम्हास त्या दिवशी भोजन मिळण्यास ३॥–४ वाजले ! पहिल्या मजल्याच्या गॅलरीतून हा डोहाळजेवणाचा सोहळा आम्हांस पहावयास मिळाला.

येथे अनेक कलाकार सेवाभावाने येतात. पहाटे 'नारायण नारायण' यां वाजविल्या जाणाऱ्या अती मधुर स्वरांनी मी जागा झालो व मला माझ्या सतारपटु काकाच्या सतारीवर वादनाची आठवण झाली. नंतर भक्तिपर पदें पेटीतबल्याच्या साथीवर ऐकावयास मिळाली. महिलांनाहि अशी गायन सेवेची संधि मिळते, पण स्वंयपाकातून जरा फुरसत काढून उशिरा नंतर रात्री कीर्तनाचा कार्यक्रम असतो. कलाकार ठरलेले आहेत. एक काशीचे व दुसरे ग्वाल्हेरचे दुसरे नाथपंथी असून मस्तकावर निमुळता होत जाणारा टोप, अंगात कफनी कानात जाड व मोठी कुंडले, दोन्ही बाजूला ढोल वाजविणारे त्यांचे शिष्य उभे, एक-दोन झांजाने ताल धरणारे असा यांचा विशेष थाट. पण या दोघांच्या कीर्तनपध्दतीपेक्षा महाराष्ट्रातील कीर्तनपध्दती आर्या, कटाव, रागदारीतील पदे, साक्या इत्यादिकांनी युक्त अधिक ढंगदार आहे असे मला आढळून आले. कीर्तनात बुवांना व त्यांच्या साथीदारांना अस्सल कनोजी अत्तर हाताच्या बोटांनी लावल्यावर सर्व श्रोत्यानांही लावण्यात येते. एक अगर दोन व्यवस्थापक कचेरीतील पूर्वीच्या काळच्या शिपायाप्रमाणे डाव्या खांद्यावरून जानव्याप्रमाणे खाली तिरका व सदऱ्यावरून लोंबणारा लाल पट्टा, संस्थानच्या पितळी बिल्ल्यासह, घालून शांतता हसुव्यवस्था बघत दारी उभे असतात व एखादा श्रोता त्यांच्या दृष्टीने अनिष्ट आढळल्यास यास सूचना देऊनहि तो न उठल्यास बकोटिला धरून त्याला उठवून बाहेर घालविले जाते.

कीर्तनानंतर भक्तिपदे, भजन, गायन इत्यादी कार्यक्रम बहुधा पहाटे पर्यंत चालतात. त्यात ग्वाल्हेरच्या ए. जी. च्या ऑफिसमधील श्री रत्नपारखी यांचा मालकंस मला विशेष आवडला व मी तसे त्यांज जवळ बोललोहि. ते उत्तम आर्टिस्टहि आहेत. मंदिराच्या आतील बाहेरील भिंतीवरील विविधाकृतींसह रंगकाम ते सेवाभावाने व मोठ्या हौसेने करताना दिसले.

नवमीला जन्मकाळी इतर ठिकाणाप्रमाणे पाळण्यांत नवजात श्रीरामाचे प्रतीक

म्हणून एकादे बाहुले वस्त्रात गुंडाळून ठेवून कीर्तनाने जन्मोत्सव साजरा केला जातो. त्यादिवशी सर्वांस उपासाचे अनेक पदार्थ वाढण्यात येतात. रात्री कीर्तन भजन गायनादि कार्यक्रम होतात. दशमीला सकाळ पासून काही भक्त परंतू लागतात. काही एकादशीस व उरले सुरले व्दादशीचे पारणे सोडून परततात.

एकादशीस श्रीरामलक्ष्मण, सीतादि मूर्तीस स्वत: स्नान घालून पूजा करण्यासाठी भक्तांची रांग लागते. सोवळ्यानेच तेथे प्रवेश मिळतो.

मी नाशिक पंचवटीच्या रहिवाशी पंचवटीच्या काळचा रामास एकादशीस अनेकदा स्नान घालताना जवळून पाहिले आहे त्या मूर्ती स्वतंत्र तीन पाषाणाच्या पण येथील राम- लक्ष्मण-सीता- भरत - शत्रुघ्न व मारुति या मूर्ती एकाच काळ्या पाषाणावर खोदलेल्या आहेत . मारुतिराय श्रीरामाच्या उजव्या बाजूस पायाशी आहेत .

सूर्यवंशीय विक्रमादित्य राजास एकदा स्फूर्ति झाली कीं आपल्या ख्यातनाम पूर्वजाची, श्रीरामचंद्राची जन्मभूमि अयोध्येस जाऊन प्रत्यक्ष पहावी. पण तेथे गेल्यावर निश्चित ठिकाण कोणीहि त्याला दाखवू शकले नाही. म्हणून तो चिंतातूर बसला असता एका दिव्य पुरुषाचे दर्शन त्याला घडले. त्याची प्रार्थना राजाने केल्यावर त्याला काशीस जाऊन श्रीविश्वनाथजींची आराधना करण्याबद्दल आदेश मिळाला. काशीस शिवाराधना केल्यावर वृध्द ब्राह्मणाचे रुपात त्याला श्रीशंकरांनी दर्शन देऊन सांगितले 'राजा, ही माझ्या हातातील पोथी व माझ्याजवळ उभी असलेली कामधेनु घेऊन तू अयोध्येस जा. शरयूतीरी हिला चारीत मागोमाग चालत रहा. तिचे स्तनातून ज्या ठिकाणी दूध गळू लागेल ते श्रीरामाचे जन्मस्थान समज.

राजाने तसे करता जन्मस्थान सापडले. लगेच तेथील ब्राह्मणास बोलावून त्याने सर्व हकिगत त्यांना सांगितली व ती पोथी दाखविली. तिच्या आधारे विद्यमान श्रीराम-मूर्ती तयार करवून तिची प्राणप्रतिष्ठा राजाने विधियुक्त केली व पोथींत दिलेल्या वर्णनाचे आधारे इतर तिर्थस्थानांचा पत्ता लावून तेथेहि मूर्तीची स्थापना केली. पुढे कालांतराने मूर्तिभंजक बाबर येत आहे असे कळताच भीतीने पुजाऱ्यानी ही श्रीराममूर्ती शरयू प्रवाहात दडवून ठेवली. काही काळाने पं. नरसिंहराव या महाराष्ट्रीय ब्राह्मणांस दृष्टांत होऊन ही मिळाली. त्यावेळचे अयोध्येचे राजे महाराजा दर्शनसिंह यांच्या साहाय्याने महाराष्ट्रीय ब्राह्मणानीच स्वर्गव्दार तीर्थावर श्रीनागेश्वर मंदिराजवळ हे मंदिर बांधून स्थापना केली. तीच ही विद्यमान मूर्ति होय.

येथून सुमारे एक मैलावर , टेकडीवर श्रीहनुमानगढी मंदिर आहे. चढावयास पायऱ्या चांगल्या आहेत. मूर्ति मोठी व भव्य आहे. श्रीरामानी निजधामास जाण्याचे

वेळी अयोध्येचे राज्य हनुमंताकडे सोपविले तेव्हा त्याला ते म्हणाले.

'अचलं हि अयोध्यायां राज्यंकुरु समाश्रितः
अभस्थितीनां सिध्दानां सिध्दिदो भव सर्वदा ।।१।।

यावश्चंद्रश्च सूर्यश्च यावत्तिष्ठति मेदिनी
यावन्मम कथा लोके, तावद्राज्यं करिष्यसि ।।२।।

जो पर्यंत चंद्र सूर्य व पृथ्वी आहें, जो पर्यंत माझें भजन पूजन व कथेमध्ये लोकांना प्रेम आहे तोपर्यंत तूं या अयोध्येचे अचल राज्य कर. येथे राहाणाऱ्या सिद्ध लोकांना सिद्धि देणारा हो.

हा हनुमान आता येथील राजा झाला आहे. कार्तिक शु. १४ ला या श्रीहनुमंताचा जन्मोत्सव मोठ्या थाटाने साजरा होतो.

उत्तरेस कनकभवन अथवा सुवर्णमंदिर विस्तीर्ण व भव्य आहे. हे सकाळी ९ वाजता उघडते. हिरव्या निळया रंगाच्या विद्युतप्रकाशात मंदिरातील मूर्ति नेत्रांना आल्हाद देतात. जनकाने कन्यादानाचे वेळेस सीतेला अहेर म्हणून दिलेला सुवर्णमहाल हा होय. येथील सेवा-पूजादि अधिकार टीकमगढचे महाराणी साहेबांकडे आहे.

शरयूतीरी लक्ष्मण किल्ला (वाडा मंदिर) आहे. हा फारसा उंच नाही. येथून सूर्यास्ताचे वेळी शरयूचे जलात आकाशातील क्षणोक्षणी बदलत जाणारे रंग प्रतिबिंबित होतात ती शोभा बघण्याजोगी आहे.

आधुनिक बांधणीचे श्रीतुलसीदासजीचे मंदिर एका रम्य उद्यानात हनुमानगढीचे वाटेवर राजमार्गावर आहे. त्या महान भक्ताचे दर्शन घेऊन यात्रेकरू उद्यानात विश्रांति घेतात.

श्रीरामजन्मोत्सव यात्रेसाठी समाजातील गरीब वर्गाचे हजारो यात्रेकरू येथे येतात. धर्मशाळात, मंदिरात, उघडया पडवीत, शरयूकाठी जागा मिळेल तेथे हे उतरतात. मुंडन, स्नानदेवदर्शन करून चुली पेटवून स्वयंपाक करून ते जेवतात. सामान अंगावर ओझे वहाता येईल इतकेच. बहुसंख्य उत्तर प्रदेशातीलच यात्रिक असतात.

येथे रवरी पट्याच्या लाकडी खडावा केवळ आठ आण्यात मिळाल्या. बाकी वस्तूंचे बाजारभाव मुंबई–पुण्या प्रमाणेच. एकादशीस संध्याकाळी जटारांचे श्रीराममंदिरात

पुजाऱ्यांनी विचारताच त्यांनी सम्मति दिल्यामुळे माझे कीर्तन झाले. श्री. गोखल्यांची साथ मिळाली.

एकादशीसच, येथील एकंदर व्यवस्था पाहून प्रसन्न झाल्यामुळे, उत्सव वर्णन पर श्लोक (मुद्दाम मराठीत) तावडतोब रचून महंतांना एक सुवाच्य प्रत मी अर्पण केली. नवपरिचित श्री. शिदोरे यांनी लगेच आपल्या चोपडीत ते श्लोक उतरून घेतले व माझी प्रत येथे आल्यावर सापडेना म्हणून कळवताच तत्परतेने ते श्लोक लिहून त्यांनी मला पाठविले ते शेवटी दिले आहेत.

अयोध्या नगरपालिकेने यात्रेत रोगराई होऊ नये म्हणून स्वच्छता दक्षतेने ठेवलेली दिसली. गाव लहान आहे. या प्रवासात सध्या दुर्मिळ असा प्रामाणिकपणा मनकापूर जंक्शनच्या हमालाचा मला अनुभवास आला. गोरखपूर लखनौ गाडीतून तेथे उतरल्या-बरोबर प्रथम पलीकडे उभ्या असलेल्या अयोध्येच्या गाडीत रात्री १ चा सुमार असल्या-मुळे झोपण्यासाठी एक बर्थ तिसऱ्या वर्गाचा पकडला व हमालास एक रुपया देऊन तिकीट आणण्यास सांगितले. बराच वेळ झाला तरी तो परत आला नाही तेव्हा एक सहप्रवासी म्हणाला 'काका, कॉलऱ्या चे इंजेक्शन घेतल्याचे डॉ. चे सर्टिफिकेट शिवाय तिकीट मिळणार नाही हमालाला. तेव्हा माझ्या लक्षात आले की काशीच्या श्रीदेवशास्त्रीजींनी मला अडचण पडू नये म्हणून इष्ट सर्टिफिकेट मिळवून दिले होते. मी डब्याचा नंबर टिपून. ठेवून पलिकडे गेलो तो तिकीट ऑफिसपाशी हमाल होता ! मी विस्मित झालो त्याने रुपयाची नोट पुढे केली. वगैरे मी त्याला प्रामाणिकपणाबद्दल गौरवून हमाली व्यतिरिक्त बक्षीशी दिली. नाशिकला एकदा मी जरा आजारी म्हणून एस्. टी. चे तिकीट काढायवास हमालाला पैसे दिले, व वाट पहात उभा राहिलो हमाल गेला तो परत आलाच नाही ! त्या अनुभवाची यावेळेस आठवण झाली.

वर वर्णन केलेला श्रीरामजन्मोत्सव मनोरंजन करणारा व कीर्तनरूपाने काहीसा बोधप्रद होता पण आपल्या पूर्वजांनी ज्या हेतूनें हा उत्सव सुरु केला तो म्हणजे श्रीराम-चंद्राचे विशेष गुणवर्णन व त्यांचे अनुकरणामुळे मानवास आपले जीवन कसे उज्ज्वल करता येईल याचा अभाव मला जाणवला.

मी प्रसन्न मनाने श्रीरामरायांचा निरोप घेऊन निघालो व लखनौ मार्गे सुमारे २४ दिवसांनी एकटा सुखरुप यशस्वी यात्रा करून परत कल्याणास आलो.

**श्री काळाराममंदिर अयोध्या जन्मोत्सव प्रशस्ति**

**श्रध्दा जयाच्या मनिं देव त्याला असा इथे प्रत्यय गोड आला ।**
**जन्मोत्सवाला बहु लोक येती प्रसन्न होऊन घरास जाती ॥**

निवास नी भोजन नी चहाही　यांची व्यवस्था बहु छान होई।
वाटे मना कीं प्रतिवर्षियावे　यथेष्ट या भक्तिसुखा लुटावे ।।
जिह्वा यदा भोजनिं सेवि अन्न　रुची गमे हा ! अमृता समान।
त्या धन्य माता भगिनी समस्त　सेवार्थ ज्या हे करितात कष्ट ।।
ते अन्यही सेवक साच धन्य　जे जोडिती येथ अपार पुण्य।
सर्वांवरी या सतत प्रसन्न　श्रीराम, मातें लव संशयो न ।।
सुधन्य ते श्रीनरसिंह राव　ज्यांच्यामुळे हे प्रभु राम राय
पुन्हा उभे मंदिरिं राहिले या　सश्रद्ध जीवांप्रति उध्दराया ।।
महंतजी श्री नथुभट्ट येथे　दीर्घावधी सेविति राघवाते।
तद्दर्शनी पुण्य फळासी आलें　वाटे मला भाग्य महा उदेलें ।।
पुढेंहि जन्मोत्सव हा करोत　असाच सोत्साह नवे महंत।
प्रसन्न होवो प्रभु रामचंद्र　अनन्य भक्तांवरती सुशीघ्र ।।
संकीर्तनी गायनि वादनात　मजेत झाला नवमी निशांत।
किती कलावान् प्रभुरामराया,　हे सेविति भाविक, तोषवाया ।।
सेवेविना ना मज दे निरोप,　ही प्रार्थना राघव मायबाप ।।
सेवेंत आयू मम शोष जावो,　अंती तुझी संस्मृति नीट राहो ।।
छत्रेकुळी केशव शास्त्री पुत्र,　प्रसन्न देवालयिं या नितांत।
स्त्री प्रशस्ति द्रुत विश्वनाथ,　प्रसन्न हो, हे रघुनाथ ! तात !!

—o—o—o—

## टीपा

१) अयोध्या महात्म्य, संपादक व प्रकाशक श्री. महंत नथूभट्टजी मढीकर श्रीकाळेराम मंदिर, स्वर्गव्दार अयोध्या फैजाबाद. या पुस्तकाचे आधारे श्रीराम जन्मस्थान वर्णन केले आहे. पुस्तकावर मूल्य दिले नाहीं पण रु. ०––२५ मी दिल्याचे स्मरते

२) वाराणसी ते अयोध्या अंतर १८९ कि. मि. मेल एक्सप्रेसला सुमारे चार तास लागतात हे अंतर तोडावयास वाराणसी-लखनौ मार्गावर अयोध्या व फैझाबाद ही दोन्ही स्टेशने या क्षेत्रासाठी आहेत.

३) अयोध्येस जाता येता दोन संस्कृत पाठशाळांच्या पाटया दृष्टीस आल्या. आणखीही पाठशाळा असतील. उत्तरप्रदेशात अशा संस्कृत पाठशाळा पुष्कळ आहेत. सर्व बाबतीत अग्रेसर राहण्यास धडपडणाऱ्या महाराष्ट्र शासनाने यापासून बोध अवश्य घ्यावा व संस्कृतच्या प्रसारार्थ विद्यमान पाठशाळांना तरी भरघोस सहाय्य व उत्तेजन द्यावे.

# श्रीरामगीतांजली

राम सीतेला वनात पाठवितात व तिचा त्याग आपण केल्याचे वृत्त तिला कळवितात. गंगेच्या तिरावर लक्ष्मण जेव्हा रडत रडत व भीत भीत सीतेला हे दारुण वृत्त सांगतो तेव्हा सीता त्याला म्हणते –

दुःखभोग भाळी आहे ठेविला विधीनें
जन्म यातनांच्या साठीं दोष कुणा देणें . . ॥धृ०॥
सांग लक्ष्मणा राजाला एवढा निरोप
हातुनी न माझ्या घडले कोणतेंही पाप
अग्निदिव्य पूर्वी केलें सहन शांततेनें ॥१॥

लोकसंशयाची भीती घेउनी मनांत
आज मला टाकुनि देतां पुन्हा काननांत
उचित दिसे रघुवंशाला काय श्लाघ्यवाणें ? ॥२॥

पिता बंधु देवही माझा पती सर्व कांहीं
गुरू रक्षिता त्याहूनी अन्य कुणी नाहीं
वंदनीय आज्ञा त्याची भक्तिभावनेने ॥३॥

रक्षणार्थ नसता जरि हा गर्भभार पोटी
तरी घेतली मी असती शीघ्र मरण भेटी
वाढवीन तव वंशाचा वेल दक्षतेनें ॥४॥

एवढीच उरली माझी विनंती तयाते
जरी कलत्राचा नाहीं मान जानकीते
परी प्रजा म्हणुनी मजला वागवी कृपेनें ॥५॥

अन्य जन्म घेता व्हावे रामचंद्र स्वामी
विरह मात्र तेथ नसावा; प्रार्थना करी मी
काळ अतां उरला जावो रामचिंतनानें ॥६॥

पुन्हा आज सोडुनि जासी मला एकटीला
उदरिं ठेव रामप्रभूंची दैव सोबतीला
शोक ऐकिलारे माझा सखी जान्हवीनें ॥७॥

—दिवाकर घैसास, डोंबिवली (पूर्व)

# अनंतता

## ( न्यायरत्न विनोद यांच्या अभंगावरील विवेचन )

झुरे माझा जीव, तुझ्यासाठी मात्र
पुढे केले पात्र, अभंगाचे
तुझी प्रेमभिक्षा, घेऊनी एकदा
हसेन गद्‌गदा, अनंतते
धीर करी आता, शब्द निर्वाणीचा
काढुनी ही वाचा, थांबवितो

( अ. सं. पृ. ३६ )

गुरुदेव म्हणतात की हे अनंतते तुझ्यासाठी माझा जीव झुरतो आहे व तुझ्याकरिता मी अभंगांचे पात्र पुढे केले आहे. तुझी प्रेमभिक्षा मला एकदा मिळाली म्हणजे मी तृप्तीने खद्‌खदा हसेन. तर आता तू प्रसन्न हो. एवढीच तुला विनंती करून मी वाचा थांबवतो. तात्पर्य, आपण जे आहोत ते तसेच कोठून आलो आहोत व जेथून आलो तेमूळ ठिकाण यांचा प्रत्यय घेण्याची तीव्र इच्छा कवीला झालेली आहे. या पार्थिव जगात सर्व प्रकारचे प्रसंग धक्के बुक्के सोसूनहि अंती त्याहून वेगळा मी म्हणून काही उरतोच. हे सर्व सहन करण्याची शक्ति त्या अनंततेतूनच मिळत असते. आपल्या शरीरामध्ये हवा आहे, व शरिराभोवतीही हवा आहे. निव्वळ आतली किंवा बाहेरची हवाच जर गतिमान असली तर या शरीराचे केव्हांच धिडवडे उडून ते पंचतत्वात मिसळून गेले असते. परंतु आतील व बाहेरील दोन्ही हवांचा परिणाम परस्परांवर होऊन आत्मा सशरीर राहून त्याच अनंततेला किंवा सहन शक्तीला शोधण्याचा प्रयत्न करीत असतो. त्याला वेगळी अशी अनंतता म्हणजे अशरीरिणी शक्ति प्रतीत होत नाही. कारण तिचे प्रतीत होणे वा शरीराला सदैव जाणवतच असते. ते वेगळया तऱ्हेने प्रतीत होणे म्हणजे सशरीर आत्म्याला अशरीरिणी शक्ती दृग्गोचर होणे होय. तसे घडले न घडले तरी त्या शक्तीचा अनुभव तरी प्रत्यक्षात यावा व गूढ उकलावे ही कवीची इच्छा आहे.

श्री. चिपळूणकर गुरुजी.

# साईखेड्याचे श्रीदादाजीधूनीवाले

(उत्तरार्ध)

श्री. ना. हुद्दार

### सोहागपूरच्या रानात पुनः 'रामफल' प्रगट झाले

या घटनेस ५---६ दिवस होत नाही तोच सोहागपूरच्या रानात 'रामफल' फिरत असल्याची बातमी हुशंगाबाद मध्ये आली. पोलिसने जाऊन आपली खात्री करून घेतली. 'जो मनुष्य विहिरीत पडून मृत झाला, म्हणून पुरण्यात आला' असा त्यांनी रिपोर्ट लिहिला होता तो रिपोर्ट खोटा ठरण्याची वेळ आली ! ज्या ठिकाणी शव पुरले होते ती जागा खणून पहाण्यात आली पण त्या ठिकाणी शवाचे कोणतेच चिन्ह आढळले नाही.

सोहागपूरच्या इमलिया रानातील एका औदुंबर वृक्षाखाली त्यांनी एक धुनी पेटविली व ती जवळ ते राहू लागले. ही वार्ता सर्वत्र पसरली व असंख्य लोक दर्शनास येऊ लागले.

### नरसिंग पुरच्या प्रेमदासाकडे वास्तव्य

नरसिंगपुर येथील प्रेमदास नित्य भाविकपणे त्यांच्या दर्शनास येई व कर्जाच्या बोझ्यामुळे त्रस्त झाल्याचे सांगे. काही दिवसानीं नरसिंगपुरला जाऊन प्रेमदासकडे दादाजी काही दिवस राहिले. एके दिवशी प्रेमदासला नर्मदेची एक सूपभर रेती आणण्यास त्यानी सांगितले. ११--१२ मैलावर ब्रह्माण्डघाटाला नर्मदा वहाते तेथे जाऊन प्रेमदासने सूप भर रेती आणली व दादाजी जवळ ठेवली. रेती हाताने चिवडीत तोंडाने दादाजी कांही गुणगुणू लागले. काही वेळाने रेतीऐवजी सोन्याच्या मोहरा तेथे दिसू लागल्या. भोवताली असलेले लोक हे दृश्य पाहून स्तंभित झाले. प्रेमदासला त्या मोहरा देऊन कर्जमुक्त होण्यास सांगितले. पुनः कर्ज न काढण्याचा आदेश दिला.

नरसिंगपुरचे सर्कल इन्स्पेक्टर गौरीशंकर, व्यापारी रामरतन सिंह व इतर अनेक भक्तांनी गुरुपौर्णिमेला दादाजीकडून समारंभपूर्वक गुरुमंत्र घेण्याचे ठरविले व तशी उत्साहाने तयारी चालू केली. गुरुपौर्णिमेच्या दिवशी प्रातःकाळी सर्वजण दादाजींना घेऊन ब्राम्हणघाटावर आले व समारंभाची तयारी सुरू झाली. इतक्यात दादाजी धावत नर्मदा नदीत शिरले, व तोंडाने काही गुणगुणू लागले. दोन्ही ओंजळ्या भरून खूप पाणी